REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख २० मार्च, १९४० अंक १२

'अर्थ' ग्रन्थमाला

## बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

### दुसरी आवृत्ति तयार झाली.

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—( १ ) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
( २ ) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### परीक्षेस ४४ हजार उमेदवार

संयुक्त प्रांतांत व्हर्नॅक्युलर फायनल परीक्षेस यंदा ४४ हजार उमेदवार बसले असून सुमारें २०० ठिकाणीं ती घेण्यांत आली आहे.

### लिनोलियमला प्रचंड मागणी

ग्रेट ब्रिटनमधील युद्धपुरवठा खात्यानें फौजेच्या उपयोगासाठीं २० लक्ष वार लिनोलियमची मागणी केली आहे, अशी माहिती पार्लमेंटमध्यें देण्यांत आली. ह्या खात्यास २०० कोटि रुपये किंमतीच्या युद्धोपयोगी मालाची तरतूद एका वर्षांत करावी लागते. शिपाई व लढाऊ सामानाचे कारखान्यांतील कामकरी ह्यांच्या सोयीकरितां वरील लिनोलियम जमिनीवर अंथरण्यांत येणार आहे. वीस लक्ष वार लिनोलियम पसरलें तर तें पॅरिस ते जिब्राल्टर एवढी जमीन व्यापील. ब्रिटिश कारखानदारांस त्याच्या पुरवठ्यामुळें किती प्रचंड काम मिळालें आहे याची यावरून कल्पना येईल.

### वाळूच्या पोत्यांचा पुरवठा

वाळूनें भरलेल्या गोणपाटाच्या पोत्यांचा उपयोग युद्धांत फार मोठ्या प्रमाणावर करण्यांत येतो हें प्रसिद्ध आहे. तात्पुरत्या तटबंदीच्या रचाईकडे त्यांचा उपयोग केला जातो. तागाची लागवड हिंदुस्थानांतच मुख्यत्वेंकरून होत असल्यानें बंगालमधील शेतकरी आणि गिरणीवाले ह्यांच्या कच्च्या-पक्क्या मालास युद्धामुळें अपूर्व मागणी आहे. एकट्या इंग्लंडनें १०० कोटि पोतीं घेतलीं आहेत असा अंदाज आहे. स्कॉटलंडमध्यें डंडी येथें हिंदी तागाचे गोणपाट कारखान्यांत बनवतात. गेल्या सहा महिन्यांत त्यांनीं ११ कोटि पोतीं पुरवलीं असून दर महिन्यास दोन कोटि ह्याप्रमाणें त्यांचें उत्पादन आहे.

### रेल्वे कॉन्फरन्स असोसिएशनचें अधिवेशन

इंडियन रेल्वे कॉन्फरन्स असोसिएशनचें ६० वें वार्षिक अधिवेशन दिल्ली येथें जोधपूर रेल्वेचे मॅनेजर, मि. जे. डब्ल्यू. गॉर्डन ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरलें होतें. "बिनतिकिटानें प्रवास करणारांचें नियंत्रण कसें करावें, हा अत्यंत बिकट प्रश्न आहे. ह्या गुन्ह्यास सक्तमजुरीची शिक्षा ठेवल्याखेरीज विगर-तिकिटानें प्रवास करणारांची संख्या कमी होणार नाहीं" असें ते म्हणाले. "रेल्वेज सरकारी मालकीच्या असल्या म्हणजे रेल्वेजबद्दलचें धोरण कोणाच्याहि वैयक्तिक अगर खासगी हितसंबंधांस अनुकूल न रहातां तें सर्वसाधारण जनतेच्या हिताचें असूं शकतें" असें हिंदुस्थान सरकारच्या वहातुक खात्याचे प्रमुख, सर ॲन्ड्र्यू क्लो, हे आपल्या भाषणांत म्हणाले.

### एरंडीची लागवड

१९३९-४० मधील हिंदुस्थानांतील एरंडीच्या पिकासंबंधीं सरकारी अंदाज प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून असें समजतें कीं, सर्वच हिंदुस्थानांत मिळून १० लक्ष ९ हजार एकर जमिनींत एरंडीची लागवड असून त्यापासून अपेक्षित उत्पादन ९४ हजार टन आहे. एरंडीच्या लागवडीचे बाबतींत मद्रास प्रांताचा अनुक्रम पहिला लागतो आणि मुंबईचा दुसरा येतो. एकूण लागवडीच्या १९.९% लागवड मद्रास प्रांतांत आणि ९.५% मुंबई प्रांतांत होते.

### ५०% डिव्हिडंड

कानपूर येथील स्वदेशी कॉटन मिल्स कं. लि. नें ऑर्डिनरी भागांवर ५०% डिव्हिडंड जाहीर केलें आहे. कंपनीनें १९३७ सालाचें २५% आणि १९३८ सालाचें ४०% डिव्हिडंड वाटलें होतें. प्रेफरन्स भागांस ६% डिव्हिडंड मिळालें.

### प्रमुख आक्रमणें

चालू युद्धास प्रारंभ होईपर्यंतच्या १० वर्षांतील प्रमुख आक्रमणांची यादी खालीं दिली आहे:—

| वर्ष | देश | क्षेत्रफळ चौरस मैल | लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १९३१-३२ | मँच्युरिया | ३६२,७०० | १५०००००० |
| १९३३ | उत्तर चीन | २१६,००० | ४०००००० |
| १९३५-३६ | ॲबिसिनिया | ३५०,००० | ७०००००० |
| १९३७-३९ | चीन | २८०,००० | १३८०००००० |
| मार्च १९३८ | ऑस्ट्रिया | ३२,३६९ | ६६००००० |
| „ १९३९ | झेकोस्लोव्हेकिया | ५४,२०७ | १४६००००० |
| „ १९३९ | मेमेल | १,०९९ | १५१००० |
| एप्रिल १९३९ | अल्बेनिया | १०,६२९ | १०००००० |

### स्टँडिंग फिनॅन्स कमिटी

मध्यवर्ती असेंब्लीच्या स्टँडिंग फिनॅन्स कमिटीच्या अधिकार क्षेत्राबद्दल वांधा उत्पन्न झाल्याकारणानें गेलीं तीन वर्षें ती अस्तित्वांतच नव्हती. तिचें आतां पुनरुज्जीवन करण्यांत येणार आहे. कमिटीच्या सभासदांची निवड लवकरच होईल.

### उद्योगधंद्यांस सरकारी सहाय

लहान आकाराच्या उद्योगधंद्यांस पैशाची मदत मुंबई सरकार देत असते, त्या संबंधांतील अटींचा जाचकपणा आतां कमी करण्यांत आला आहे आणि त्याचा फायदा गेल्या सहा महिन्यांत अनेक कारखानदारांनीं घेतला आहे, असें मुंबई सरकारच्या उद्योग खात्याचे प्रमुख, मि. अडवानी, ह्यांनीं नुकतेंच सांगितलें.

### तीन महिन्यांसाठीं ४३/४ अब्ज रुपये

चालू वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीकरितां सुमारें ४३/४ अब्ज रुपयांचा लष्करी खर्च फ्रान्सच्या चेंबर ऑफ डेप्युटीजनें मंजूर केला आहे.

### जबलपूर येथील सहकारी सेंट्रल बँक

जबलपूर येथील को-ऑपरेटिव्ह सेंट्रल बँकेनें तूर्त पैसे देण्याचें बंद ठेवलें आहे. बँकेच्या रिझर्व्ह फंडाचा ठेवीदारांच्या ठेवी परत देण्याकडे विनियोग करण्याची बँकेस परवानगी मिळावी, अशी बँकेच्या अधिकाऱ्यांनीं सहकारी खात्याच्या राजिस्ट्रारकडे मागेंच विनंति केलेली आहे.

### यूनियन बँक ऑफ इंडिया लि

यूनियन बँकेस ३१ डिसेंबर अखेर संपलेल्या ९ महिन्यांत २ लक्ष, ५७ हजार रु. नफा झाला. प्रत्येक ५ रुपयांच्या भागावर ३ आ. ६ पै करमाफ डिव्हिडंड मिळालें.

### बँकांस सुटी

ता. २१ रोजीं जमशेदी नवरोज निमित्त, ता. २२ रोजीं गुड फ्रायडे निमित्त आणि ता. २३ व २५ रोजीं ईस्टर निमित्त बँका बंद राहतील. म्हणजे, गुरुवार ता. २१ ते सोमवार ता. २५ अखेर बँकांस सुटी आहे.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १३४ | ५ हिंदी चहाच्या धंद्याची सुस्थिति ... | १३८ |
| २ जादा नफ्यावरील करांचें बिल ... | १३५ | ६ भुइमुगाची लागवड व उत्पादन ... | १३८ |
| ३ ब्रिटिश बँका आणि युद्ध-परिस्थिति ... | १३६ | ७ प्रो.काळे ह्यांचीं व्याख्यानें | १४० |
| ४ स्फुट-विचार ... | १३७ | ८ औंध स्टेट बँ. अँन्ड इं. कं. लि. ... | १३९ |
| अत्याचाराचा सार्वत्रिक निषेध–रूसो फिनिश-तह–हिंदी उद्योग–धंद्यांचें संरक्षण | | ९ इंपीरिअल इन्स्टिट्यूट ऑफ शुगर टेक्नॉलॉजी ... | १४२ |
| | | १० निवडक बाजारभाव | १४३ |

अर्थ

बुधवार, ता. २० मार्च, १९४०

## जादा नफ्यावरील करांचें बिल

### सिलेक्ट कमिटीनें केलेली सुधारणा

जादा नफ्यावरील करांचें बिल मध्यवर्ती असेंब्लीच्या सिलेक्ट कमिटीकडे तपशीलवार तपासणीसाठी पाठविण्यांत आलें होतें. सिलेक्ट कमिटीनें मूळ मसुद्यांत कांहीं सुधारणा करून आपला रिपोर्ट असेंब्लीस सादर केला असुन दुरुस्त मसुद्यावर असेंब्लींतील सर्वसाधारण चर्चाहि पुरी झाली आहे. बिलाच्या प्रत्येक कलमाचा स्वतंत्रपणें विचार होऊन आतां तें असेंब्लींतून बाहेर पडून कौन्सिल ऑफ स्टेटकडे मंजुरीसाठी जाईल. ग्रेट ब्रिटनमध्यें १९३९ साली एक्सेस प्रॉफिट टॅक्स अमलांत आला, त्या कराच्या योजनेस अनुसरूनच प्रस्तुत बिलाची योजना करण्यांत आलेली आहे. जादा नफ्यावरील कराचे बिलास सर्व हिंदुस्थानांत तीव्र विरोध व्यक्त करण्यांत आला. युद्ध–परिस्थितीमुळें लोकांस होणाऱ्या फायद्यांतला वाढता अंश प्राप्तीवरील कर आणि सुपर टॅक्स ह्यांच्या द्वारा सरकारच्या तिजोरींत जाईलच, लोकांकडून हिंदुस्थान सरकारनें जादा कर घेणें म्हणजे त्या लोकांची प्रांतिक सरकारांस कर देण्याची शक्ति कमी करणें होय, युद्ध–परिस्थितीचे अनुकूल सांपत्तिक परिणाम नफ्याऐवजी तूर्त तरी अडचणीच्या स्वरूपाचेच आहेत, जादा फायद्यावर कर बसविण्याची आवश्यकता सिद्ध झालेली नाहीं, इत्यादि आक्षेप नियोजित कराविरुद्ध घेण्यांत आले होते. सिलेक्ट कमिटीनें ते विचारांत घेऊन आणि सरकारचें शक्य तेवढें उत्पन्न कायम ठेवून बिलांत सुधारणा केल्या आणि मूळ योजनेपेक्षा दुरुस्त बिल बऱ्याच प्रमाणांत कमी असमाधानकारक झालें असें म्हणतां येईल. १९२२ च्या इनकम टॅक्स अॅक्टांतील घसाऱ्याची तरतूद कायम राखणें, विमा–व्यवसाय बिलाच्या कक्षेबाहेर ठेवणें, मामुली नफ्याचा दर ठरविण्याचे बाबतींत अधिक सवलत देणें, करास पात्र होणाऱ्या उत्पन्नाची किमान मर्यादा वीस हजारांची तीस हजार करणें, १ सप्टेंबर, १९३९ च्या नंतरच्या नफ्यावरच कर बसविणें, पाश्चात्य देशांतील तत्सम करविषयक कायद्यांत अंतर्भूत असलेल्या सवलतींचा हिंदी कायद्यांत अंतर्भाव करणें, कर हप्त्यांनीं भरण्यास परवानगी देणें, ८ व्या कलमाप्रमाणें अपील करण्यास मुभा ठेवणें, १ ऑक्टोबर १९४० पूर्वी अपील ट्रायब्यूनलची स्थापना करणें इत्यादि महत्त्वाच्या सुधारणा सिलेक्ट कमिटीनें केल्या आहेत.

व्यापारी वर्गानें सुचविलेल्या सर्व सुधारणांचा वरील यादींत समावेश झालेला नाहीं, हें दिसून येईल. तथापि, मूळ मसुद्याचे मानानें दुरुस्त बिल बरेंच समाधानकारक आहे, हें वर सांगितलेंच आहे. मार्च, १९४१ चे अखेर कराच्या आकारणीची मुदत मध्यंतरीं त्याबाबत कायद्यांत दुरुस्ती केली नाहीं, तर समाप्त होणार आहे. ह्या तारखेपूर्वीहि आणि त्यानंतर प्रतिवर्षी फिनॅन्स बिलाचे वेळीं विधिमंडळास कराच्या दराचा फेरविचार करण्याचा अवसर आतां रहाणार आहे. बिलाच्या कारणांचे यादींत प्रस्तुत कर-योजना ही युद्धविषयक परिस्थितीसच लागू असल्याविषयींचा खुलासा करण्यांत आला आहे. हिशेबाच्या वर्षांत बरीच समाधानकारक सुधारणा करण्यांत आलेली आढळते. कंपनीच्या व्याख्येंत संस्थानांतील कायद्याप्रमाणें स्थापन झालेल्या कंपन्याहि आतां अंतर्भूत व्हावयाच्या आहेत. आयुर्विमा कंपन्यांच्या नफ्यास दिलेली करमाफी इतर प्रकारच्या विम्यांस दिलेली नाहीं. अशा प्रकारें जादा नफ्यावरील कराचें स्वरूप बरेंच पालटलें आहे. करापासून मिळणाऱ्या नफ्याचा कांहीं अंश उद्योगधंद्यांच्या वाढीकडे करण्यांत यावा, अशी सुचना असेंब्लीमध्यें करण्यांत आली, तिला फडनविसांनीं विरोध दर्शविला. उद्योगधंद्यांस मदत करण्यासाठी जादा नफ्यावर केव्हांहि कर बसवितां येईल; त्यासाठी युद्ध परिस्थितीची आवश्यकता उरणार नाहीं, असें त्या सूचनेवर फडनविसांनीं भाष्य केलें. सरकारास जादा उत्पन्न हवें आहे; प्रस्तुत कराचा तो उद्देश सरळ आणि स्पष्ट आहे. "माझी स्थिति वाघावर बसून जाणाऱ्या बाईसारखी झाली आहे. वाघ परत आला, तेव्हां बाई मात्र वाघाचे पोटांत होती आणि तो हसत होता. सिलेक्ट कमिटीवर स्वार होतांना माझी तशीच स्थिति झाली आहे," असें जादा नफ्यावरील कराचे बिलांत सिलेक्ट कमिटीनें केलेल्या दुरुस्त्याबाबतचें विनोदी वर्णन फडनविसांनीं केलें, तें जरा भडक असलें तरी एकंदरीनें पहातां बिलाचें स्वरूप बऱ्याच अंशीं पालटलें आहे, ह्यांत शंका नाहीं.

जादा नफ्यावरील कराचा सरकारनें घ्यावयाचा नियोजित ५०% हा दर उतरविण्याचा असेंब्लींतील लोकनियुक्त सभासदांनीं कसून प्रयत्न केला. प्राप्तीवरील कराची आकारणी आतां उत्पन्नाच्या प्रत्येक चढत्या टप्प्यास वाढत्या दरानें करण्यांत येते. तीच टप्प्याची पद्धत नफ्यावरील कराचे बाबतींत अमलांत आणण्यांत यावी, अशी सूचना पुढें आली होती, तिला फडनवीसांनीं विरोध केला. सध्याच्या सारख्या युद्धपरिस्थितींत जादा नफ्याचा निदान निम्मा हिस्सा तरी सरकारास मिळावा; मामुली नफ्यापेक्षां जास्त होणाऱ्या नफ्यावरच हा कर बसणार असल्यामुळें त्यास स्लब पद्धति सोईस्कर होणार नाहीं, तीमुळें उत्पन्न मात्र अतिशय कमी होईल, असें त्यांनीं सांगितलें. कराचा दर उतरविण्यास विरोध करतेवेळीं त म्हणाले, कीं ५०% हा दर कायम राहील हें गृहीत धरूनच सरकारनें अनेक सवलती आणि सुधारणा सिलेक्ट कमिटींत मान्य केल्या. ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर मिळालेल्या उत्पन्नावर हा कर घेण्यांत येऊं नये; निदान त्यांचें बाबतींत माफीच्या उत्पन्नाची मर्यादा १० हजारांनीं तरी वाढवावी, बँकांस हा कर यावा लागू नये, इत्यादि सुचवण्यांत आलेल्या अनेक दुरुस्त्या नामंजूर झाल्या. बिलावरील चर्चा चालू आहे, परंतु आतां त्यांत महत्वाच्या दुरुस्त्या होण्याचा संभव नाहीं.

---

## ब्रिटिश बँका आणि युद्ध-परिस्थिति

### वार्षिक सभांतील भाषणें

(४)

बार्क्लेज बँकेचे अध्यक्ष, मि. एडविन फिशर हे आपल्या भाषणांत म्हणाले:—

"आपल्या बँकेच्या नोकरांपैकी सुमारें २,००० नोकर लष्करांत दाखल झाले असून आणखीहि कांहीं नोकरांस आपणांस जाऊं द्यावें लागेल. त्यांच्या जागीं तात्पुरते कारकून नेमण्यांत आले आहेत आणि आपल्या कांहीं पेन्शनरांस पुन: कामावर बोलावण्यांत आलें आहे. ह्या सर्व गोष्टींमुळें आणि इतरहि अनेक युद्धविषयक कारणांमुळें बँकेची कार्यक्षमता बिलकूल कमी झालेली नाहीं. कांहीं लहान शाखा आम्हीं बंद केल्या असून कामाचे तासहि कमी केले आहेत. वैमानिक हल्ल्यापासून आपल्या नोकरवर्गाचा बचाव व्हावा ह्यासाठीहि तरतूद करावी लागली आणि कांहीं खातीं मुख्य इमारतीपासून दूर असलेल्या ठिकाणीं न्यावीं लागलीं. बँकेंतून लष्करांत गेलेल्या लोकांस तेथें पूर्वीइतका पगार मिळणार नाहीं. त्यांस एका महिन्याचा बँकेचा पुरा पगार देऊन पुढें दरमहा त्यांचे पगारांतील तफावतीमुळें होणारें नुकसान बँक भरून देत आहे. ह्यास बँकेचे भागीदार हरकत घेणार नाहींत, अशी खात्री वाटते... अहवालाचे वर्षांत युनियन बँक ऑफ मँचेस्टर लि. आणि बार्क्लेज् बँक लि. ह्यांचें एकत्रीकरण झालें. सुमारें २० वर्षांपूर्वीच बार्क्लेज् बँकेनें युनियन बँकेच्या भागीदारांकडून त्या बँकेचे बहुतेक भाग घेऊन त्यांस आपले भाग दिले आणि नंतर बाकीचे भाग घेऊन बार्क्लेज् बँक ही युनियन बँकेच्या सर्व भांडवलाची मालक बनली. वीस वर्षेंपर्यंत दोन्ही बँकांचा कारभार सलोख्यानें चालला. आतां त्यांचें मीलन झालें असून, युनियन बँकेचे डायरेक्टर बोर्ड हें बार्क्लेज् बँकेच्या मँचेस्टर शाखेचें लोकल बोर्ड म्हणून काम करूं लागलें आहे········ग्रेटब्रिटनच्या शेतीशीं आपल्या बँकेचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. शेतीचें राष्ट्रीय महत्त्व आतां वाढलें आहे. सरकारनें शेतीस उत्तेजन देण्यास प्रारंभ केला आहे. ज्या मानानें आपला अन्नपुरवठा स्वदेशांतच तयार होईल, त्या मानानें आपलें परदेशांवरील अवलंबन दूर होईल. त्यामुळें आपली सुरक्षितता वाढून आगबोटींच्या वहातुकीवरील आणि हुंडणावळीवरील ताण कमी होईल. आपलें शेतीचें उत्पादन वाढवावयाचें म्हटलें, म्हणजे शेतकऱ्यांस आपला माल बाजारांत विकला जाईपर्यंत तरी पैशाची जरूरी लागेल. ही मदत त्यांस अल्प मुदतीचीं कर्जें देऊन बँकांस भागवावी लागेल. मालास चांगली किंमत येईल आणि दूरदृष्टीनें त्यांस योजना आखतां येईल. अशी परिस्थिति निर्माण झाल्यास बँका त्यांस सढळ हातानें मदत देऊं शकतील. अर्थात् प्रत्येक शेतकऱ्याच्या वैयक्तिक परिस्थितीवर त्यानें बँकेकडून कशाची अपेक्षा करावी, हें अवलंबून रहाणें साहजिक आहे.........

...शांततेच्या काळांतहि ग्रेटब्रिटनला मोठ्या प्रमाणावर मालाची आयात करावी लागते; तेव्हां सध्याच्यासारख्या परिस्थितींत आयातीचें महत्त्व वाढणार हें उघड आहे. आपलें सातासमुद्रावरील दळणवळणाचे मार्ग खुले राखणें आवश्यक आहे. त्यावर आपलें आर्थिक सामर्थ्य आधारलेलें आहे. ग्रेटब्रिटनचें बरेंच मोठें भांडवल इतर देशांत गुतलेलें आहे, त्यापासून ब्रिटिश लोकांस बाहेरील मिळणाऱ्या उत्पन्नामुळें त्यांस आपल्या रहाणीचें मान उच्च ठेवतां येतें. माल निर्गत केल्यामुळें जसें आपणांस विदेशी माल विकत घेण्याचें सामर्थ्य उपलब्ध होतें, तशीच ही परिस्थिति आहे. आपण ह्या अदृश्य निर्गतीवर अवलंबून न रहातां, चालू आयातीचा मोबदला चालू निर्गतीचे स्वरूपांतच दिला पाहिजे."

(५)

मार्टिन्स बँकेचे अध्यक्ष, मि. एफ. ए. बेट्स हे आपल्या भाषणांत म्हणाले:—

"सध्याच्या युद्धपरिस्थितींत सरकारास व्यापार आपले नियंत्रणाखाली बऱ्याच प्रकारें आणावा लागला आहे. युद्धविषयक गोष्टींसाठी कच्च्या मालाचा आणि तयार मालाचा पुरवठा भरपूर व्हावा आणि सट्टेबाजीस आळा बसून किंमती स्थिर रहाव्या, हा त्या नियंत्रणाचा हेतु आहे. साहजीकच, त्यामुळें, वैयक्तिक देवघेवींवर बंधनें बसलीं आहेत. युद्ध समाप्त झाल्यानंतर पूर्वस्थितीस येतेवेळीं थोडी अडचण भासणें अपरिहार्य होईल...इकडे युद्ध जोरानें चालू ठेवून त्याबरोबरच आपण आपला परराष्ट्रीय व्यापार वाढवला पाहिजे. सध्या आपण इतर राष्ट्रांतून अतिशय मोठ्या प्रमाणावर माल आयात करीत आहोंत; तेव्हां त्याच्या विनिमयांत आपण पुरेसा माल निर्गत केला पाहिजे. आपल्या मालाच्या किंमती माफक असल्या तरच हें शक्य होईल. तेव्हां, किंमतींत वाढ होणार नाहीं, अशी व्यवस्था केली पाहिजे. रहाणीचें वाढतें मान आणि लोकांचा वाढता पगार ह्यांचा मेळ बसणें कसें बिकट असतें ह्याचा आपणांस अनुभव मागें आलेला आहे. त्याची पुनरावृत्ति होऊं नये ह्यासाठी व्यापाराचें सरकारी नियंत्रण, वस्तूंच्या पुरवठ्याचें नियंत्रण, जादा नफ्यावर कर, सरकारी कर्जरोखे विकत घेण्याकडे बचतीचा विनियोग, इत्यादि मार्गांचा जनतेनें आनंदानें स्वीकार केला पाहिजे."

(६)

विल्यम्स डीकन्स बँक, लि. चे अध्यक्ष, मि. जेराल्ड ह्यूहर्स्ट हे आपल्या भाषणांत म्हणाले:—

"सरकारनें कपास कापडाच्या गिरण्यांस बरीच मोठी ऑर्डर दिल्याकारणानें त्या सध्या चलतींत आहेत. त्यांस कामगारांचा तुटवडा पडूं लागला आहे. इतर किंमतींचा परिणाम सुताचे किंमतीवरहि होऊन तें महाग होऊं लागलें आहे. परराष्ट्रीय बाजारपेठांत त्यास अडचण भासूं नये ह्यासाठी सरकारनें त्याच्या किंमतीचें नियंत्रण केलें. त्यामुळें सध्या सूत कातणाऱ्या गिरण्यांस जो नफा होतो, त्यास थोडी काट बसेल. सूत कातण्यास पडणारी किंमत आणि तें ज्या दरानें विकलें जातें तो दर ह्यांचा हिशेब करूनच नियंत्रणाच्या मर्यादा घालून देण्यांत आल्या आहेत. गिरण्यांतील यंत्रें नेहमीप्रमाणें चालू रहातील, हें त्यांत गृहीत असलें पाहिजे, परंतु प्रत्यक्ष परिस्थिति अशी आहे कीं कामगारांच्या तुटवड्यामुळें तें शक्य झालेलें नाहीं आणि मूळ हिशेबांत त्या मानानें फरक होतो. ह्या गोष्टीकडे सरकारनें लक्ष देणें आवश्यक आहे. नियंत्रणाच्या योजनेंत, डिस्कौंट आणि कमिशन्स ह्यांचें उच्चाटण, दराक पद्धतीचा स्वीकार, करारांच्या व्यवस्थेचें स्पष्टीकरण इत्यादि महत्त्वाच्या सुधारणा आहेत. चलती घोपवून धरून मंदीचेहि दुष्परिणाम टाळण्याचें काम हें नियंत्रण करणार आहे········होसेड आणि पोलाद ह्यांच्या धंद्यास सध्या उत्कृष्ट दिवस आले आहेत. युद्धाचे प्रारंभीच ह्या धंद्यावर सरकारनें नियंत्रण घालून किंमती स्थिर केल्या आहेत, त्या कारणानें होसेड व पोलाद १०% सुद्धां महाग झालेलें नाहीं."

## स्फुट विचार

### अत्याचाराचा सार्वत्रिक निषेध

लंडन येथील कॅक्स्टन हॉलमध्यें भरलेल्या सभेंत सर मायकेल ओडवायर ह्यांच्यावर कोणा एका हिंदी इसमानें गोळी झाडल्यामुळें त्यांस तात्काळ मृत्यु आला आणि त्याचमुळें लॉर्ड झेटलंड, सर लुइ डेन व लॉर्ड लॅमिंग्टन ह्यांस किरकोळ दुखापती झाल्या. ह्या दुष्कृत्याचा तीव्र निषेध हिंदुस्थानांत चोहोंकडे झाला आहे, हें यथायोग्यच आहे. कोणताहि हेतु साध्य करण्यासाठी कोणीहि अत्याचार करणें हें गर्ह्य आहे आणि हिंदी लोकमत असल्या वर्तनास निंद्य समजतें हें प्रसिद्धच आहे. वैयक्तिक अथवा राजकीय उद्दिष्ट साधण्यासाठी अत्याचार करणारांचा माथेफिरूपणा हें शुद्ध वेडेपणाचें लक्षण आहे आणि त्यायोगानें देशाच्या प्रगतीस अडथळा येतो, ह्याविषयीं हिन्दुस्थानांत एकमत असून तें असंदिग्ध रीतीनें व्यक्त झालें आहे. इंग्लंडमध्येंहि लोकांस ह्या संबंधांत पूर्ण विश्वास वाटत असून कॅक्स्टन हॉलमधील अत्याचाराचा निषेध ह्या देशांत सार्वत्रिक व मनःपूर्वक होईल ही अपेक्षा सर्वस्वी खरी ठरली आहे. लॉर्ड झेटलंडप्रभृति मंडळी त्यांच्यावर झालेल्या अत्याचारांतून निभावली ह्याबद्दलहि समाधान व्यक्त करण्यांत आलें आहे, त्यांत सर्व हिन्दी जनता अंशभागी आहे. मागें ह्या देशांत अत्याचार मधून मधून डोकें वर काढीत असे, त्याचें सर्वस्वी निर्मूलन अलीकडे झालें असून कॅक्सटन हॉलमध्यें एका हिंदी माणसानें तसला वेडेपणा करावा ह्याविषयीं हिंदुस्थानांत चोहोंकडे खेद व संताप वाटावा हें स्वाभाविक आहे. इंग्लंडमध्यें पार्लमेंटांत व इतरत्र आणि त्याचप्रमाणें ह्या देशांत जें मत व्यक्त झालें आहे त्यावरून ह्या अत्याचाराचे धागेदोरे राजकीय परिस्थिति व भवितव्य ह्यांच्याशीं लागण्याचा संभव नाहीं ही समाधानाची गोष्ट आहे. हिंदुस्थानांतील राष्ट्रीय चळवळीस अनत्याचार व अहिंसा ह्यांची चौरस व भक्कम बैठक देण्यांत आली असल्यानें वरील संबंधांत संशय असण्याचें कारण नाहीं.

### रूसो-फिनिश तह

रशियाच्या जबरदस्त हल्ल्यांस निकरानें तोंड देऊन फिनिश सैन्यानें शौर्याची शिकस्त केली आणि अखेर मनुष्यबळ कमी पडल्यामुळें फिन्लंडला शस्त्र खाली ठेवावें लागून शत्रूच्या मागण्या मान्य करणें प्राप्त झालें. स्वतःच्या स्वातंत्र्याचे रक्षणाप्रीत्यर्थ अपूर्व स्वार्थत्याग, धैर्य व धडाडी इत्यादि गुण फिनिश राष्ट्रानें दाखवले, ह्याविषयीं त्याचें सर्व जगभर कौतुक होत आहे, तें निःसंशय योग्य आहे. पश्चिमेकडील प्रमुख राष्ट्रांनीं फिन्लंड विषयीं सहानुभूति प्रगट केली आणि त्यास दुरून शक्य तें सहाय्य दिलें, पण प्रत्यक्ष रणांगणावर रशियाची चाल थोपवण्यास त्याचा उपयोग होण्यासारखा नाहीं, असें दिसून आल्यावरून त्या शूर व स्वातंत्र्यप्रेमी लोकांस शत्रूशीं तहाचीं बोलणीं सुरू करावीं लागलीं. स्वीडन व नॉर्वे ह्यांस आपला तटस्थपणा टाकून देऊन फिन्लंडला मदत करणें, सुरक्षितपणाचें व शहाणपणाचें वाटलें नाहीं. इंग्लंड व फ्रान्स ह्यांस फिन्लंडच्या रणांगणांत आपल्या फौजा पाठवणें स्वीडनच्या धोरणामुळें शक्य झालें नाहीं. अशा परिस्थितींत सापडल्यामुळें फिन्लंडनें शेवटीं रशियानें लादलेल्या तहाच्या अटी कबूल केल्या आहेत. ह्या तहानें आपला महत्त्वाचा मुलूख फिन्लंडला रशियाच्या ताब्यांत द्यावा लागला आहे. "सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः" ह्या न्यायास अनुसरून फिन्लंडनें आपलें धोरण निश्चित केलें आहे. युद्धाचे पायीं फिन्लंडचे शंभर कोटि रुपये खर्च झाले आहेत, हजारो तरुण मृत्युमुखीं पडले आहेत आणि विस्तृत प्रदेश उध्वस्त झाला आहे. हें नुकसान भरून काढून आपल्या जीवनाची घडी पुन्हां नीट बसवण्यांत फिन्लंडला आपली सर्व शक्ति खर्चावी लागणार आहे. रूसो-फिनिश तहाचा परिणाम दोस्त राष्ट्रें व जर्मनी ह्यांच्या युद्धाच्या हालचालींवर काय होतो आणि रशिया ह्यापुढें स्वस्थ बसणार किंवा कसें हे आतां महत्त्वाचे प्रश्न उत्पन्न झाले आहेत. रशियानें फिन्लंडवर केलेल्या स्वारीनें व फिनिश लोकांवर लादलेल्या तहानें सोव्हिएट सरकाराविरुद्ध जगाचें लोकमत प्रतिकूल बनलें आहे. जर्मनीस ह्या परिस्थितीचा कितीसा उपयोग होतो हें लवकरच दिसेल.

### हिंदी उद्योगधंद्यांचें संरक्षण

जादा नफ्यावरील कराविरुद्ध घेण्यांत येणाऱ्या आक्षेपांमध्यें विशेष महत्त्वाचा आक्षेप, युद्धसमाप्तीनंतर आर्थिक मंदीनें स्वदेशी धंदे गारठतील, त्यासंबंधांत आवश्यक असलेल्या तजवीजीच्या मार्गांत त्या कराचें योगानें येणाऱ्या अडथळ्याबाबतचा आहे. सर जरेमी रेस्मन ह्यांच्या म्हणण्याप्रमाणें युद्धाप्रीत्यर्थ होणारा जादा खर्च भागवण्यास जादा फायद्यावरील करासारखा दुसरा कर नाहीं. म्हणजे फडनविसांस स्वदेशी धंद्यांची भावी स्थिरता व सुरक्षितता ह्यांचे विषयीं कराच्या जादा उत्पन्नाच्या मानानें काळजी वाटत नाहीं. हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्रि सर रामस्वामी मुदलियार ह्यांस मात्र देशी धंद्यांच्या भवितव्याचा प्रश्न सर्वस्वी दृष्टीआड करतां येत नाहीं असें वाटत असल्याचें दिसतें. युद्धसामुग्री बनवण्याच्या उपयुक्त हेतूनें स्थापन झालेल्या कित्येक धंद्यांस मागील महायुद्धाचे अखेर कठीण दिवस आले आणि त्यांस असहाय स्थिति प्राप्त झाली. ह्या कटु अनुभवापासून बोध घेण्याचें सरकारनें ठरवलें असल्याचें सर रामस्वामी ह्यांनीं मध्यवर्ती असेंब्लीमध्यें सांगितलें. शास्त्रीय व औद्योगिक संशोधनाचे उद्देशानें तज्ज्ञांचें एक मंडळ स्थापन व्हावयाचें असून त्याच्या खर्चासाठी पांच लक्ष रुपयांची तरतूद येत्या वर्षाच्या अंदाजपत्रकांत करण्यांत आली आहे. देशी धंद्यांस उत्तेजन देण्याकरितां फिस्कल कमिशननें विशिष्ट शर्ती घातल्या आहेत. त्या सैल करण्यांत येतील असेंहि सांगण्यांत आलें. सर रामस्वामी ह्यांनीं निर्दिष्ट केलेल्या धोरणाचें प्रत्यक्ष कृतींत कितीसें रूपांतर होईल आणि त्याचा स्वदेशी धंद्यांस व्यावहारिक उपयोग किती होईल ह्यावर सर्व अवलंबून राहील. हिंदुस्थान सरकारचें जकातीचें धोरण, औद्योगिक संरक्षण व उत्पन्न-खर्चाची व्यवस्था ह्यांमध्यें मेळ बसल्यावांचून देशाच्या आर्थिक प्रगतीची जोपासना होणें शक्य नाहीं. औद्योगिक नफ्याचा अंश धंद्यांच्या वाढींत भांडवलाच्या स्वरूपांत जाण्याची आवश्यकता ह्यासंबंधांत तात्काळ प्रत्ययास येते.

### लष्करी खर्चाचा असह्य बोजा

"येत्या वर्षी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष मिळून ११ कोटींची करवाढ होणार आहे. युद्धास प्रारंभ झाला नाहीं, तोंवरच एवढी करवाढ करावी लागली आणि आणखी करवाढ होण्याची शक्यता असल्याचें फडनविसांनीं सांगितलें. ह्यावरून, भाविष्यकाळाबद्दल काळजी वाटल्याविना रहात नाहीं."— मुंबई येथील इंडियन मर्चंट्स चेंबरची हिंदुस्थान सरकारास तार.

## हिंदी चहाच्या धंद्याची सुस्थिति

हिंदुस्थानांतील १९३९-४० सालामधील एकूण चहाच्या खपाचा अंदाज १० कोटि पौंड इतका करण्यांत आला आहे. त्यामध्यें हिंदुस्थानानें निर्गत करावयाचे ३६ कोटि, ४१ लक्ष पौंड मिळविले, म्हणजे १९३९–४० सालांतील हिंदी चहा सर्व खपेल, असा हिशेब होतो. ग्रेट ब्रिटननें आतां हिंदुस्थान आणि सिलोन ह्यांतील सर्व चहा स्वतःसाठी राखून ठेवल्यामुळें हिंदी चहाच्या उठावास चांगलें प्रोत्साहन मिळतें. डिसेंबर, १९३९ अखेर ग्रेट ब्रिटनकडे १३ कोटि पौंड हिंदी चहा आणि ५ कोटि पौंड सिलोनी चहा निर्गत झाला. त्यांतच, प्रत्यक्ष हिंदुस्थानांतील चहाच्या उठावांतहि गेल्या वर्षी अपेक्षेबाहेर वाढ झाली त्यामुळें, हिंदी चहाच्या धंद्यास सध्याची परिस्थिति अतिशय अनुकूल आहे.

### मुंबईमध्यें चहाचा खप

१९३९–४० मध्यें मुंबई प्रांतानें ८० लक्ष पौंड चहा घेतला. एकट्या मुंबई शहरांतील गिरणी कामगारांसच दररोज १ लक्ष, ३० हजार पेले चहा लागतो. मुंबईतील सुमारें ३,८०० चहाच्या दुकानांतून दरसाल २० लक्ष रुपयांच्या कपबशा फुटतात; ह्यावरून तेथील चहाच्या खपाची कल्पना येईल. तेथें दररोज २२ लक्ष पेले चहा आणि १६ लक्ष पेले कॉफी एवढ्याचा खप होतो. ह्या हॉटेलांत प्रत्यहीं ३½ हजार मण दूध आणि ३ हजार मण साखर लागते. ह्यांस पढणाऱ्या किंमती इतक्या रकमेचेंच सर्पणहि त्यांस आवश्यक असतें. मुंबईत दारूबंदी अंमलांत आल्यामुळें चहाचा खप विशेष वाढेल अशी अपेक्षा होती. ती फलद्रूप झालेली दिसत नाहीं. कॉफीचा खप मात्र २५% वाढला.

---

### भुइमुगाची लागवड व उत्पादन.
### १९३९–४० बाबत सरकारी अंदाज.

| | क्षेत्र ( एकर ) | उत्पादन (टन) | [illegible] |
|---|---|---|---|
| | १९३९–४० | १९३९–४० | १९३९–४० |
| मद्रास | ३,५३४,००० | १,५७६,००० | ९९९ |
| मुंबई | २,४२८,००० | ८१२,००० | ७४९ |
| मध्यप्रांत वऱ्हाड | २३३,००० | ६६,००० | ६२६ |
| ओरिसा | १९,००० | ७,००० | ८२५ |
| हैद्राबाद | १,६७५,००० | ४९३,००० | ६५९ |
| म्हैसूर | २२०,००० | ४८,००० | ४८९ |
| एकूण | ८,११२,००० | ३,००२,००० | ८२९ |

---

### दळणवळणाची सुलभता

आजच्या युगांत दळणवळण जितकें अधिक सुलभ होईल तितकी प्रत्येकाची सोय होणार आहे व याच दृष्टीनें राष्ट्रसंघानें काय करता येणें शक्य आहे याविषयीं पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. युद्धापूर्वी तर या प्रश्नाकडे सर्वांचें लक्ष अधिक वेधलें गेलें आहे. दळणवळणाचीं साधनें शक्य तितकीं जलद करणें, वाईट स्वरूपाची चढाओढ थांबवणें व सर्वत्र सारख्या सोई उपलब्ध करणें या दृष्टीनें ४० राष्ट्रांत चौकशी करून मग वरील ग्रंथ लिहिण्यांत आला आहे. तुलनात्मक अभ्यासासाठीं प्रत्येक ठिकाणीं कोष्टकें देण्यांत आलीं आहेत.


## पूर्व खानदेश
## सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.
### जळगांव.

( स्थापना : मे १९१६ ) रु.

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल. ...... | १०,००,०००।– |
| जमा झालेलें शेअर भांडवल....... | ४,६९,०००।– |
| रिझर्व्ह फंड. ...... | २,९८,०००।– |
| इतर फंडस्. ...... | ३,७७,०००।– |
| खेळतें भांडवल (३०-६-३९) ...... | ५७,८९,०००।– |

डिव्हिडंड पांच टक्के ( सहा वर्षांपासून )

हेड ऑफिस :—सेंट्रल को-आपरेटिव्ह बँक बिल्डिंग, नवी पेठ, जळगांव.

पूर्व खानदेश जिल्ह्यांतील सर्व भागांत शाखा व पे-ऑफिसेस चांगल्या रीतीनें चालू आहेत.

—: बँकर्स :—

मुंबई : मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-आपरेटिव्ह बँक लि. मुंबई.
जळगांव : इंपीरिअल बँक ऑफ इंडिया.
अहमदाबाद : बँक ऑफ इंडिया लि.
नागपूर : सी. पी. अँड बेरार प्रॉव्हिन्शिअल को-आपरेटिव्ह बँक लि. नागपूर.

बँकेचे हिशेब त्रैमासिक रजिस्टर्ड अकौंटंटचे फर्मकडून व वार्षिक सरकारी स्पेशल ऑडिटराकडून तपासले जातात.

चालू ठेवीवर : अर्धा टक्का व्याज दिलें जातें.
सेव्हिंग्ज ठेवीवर : दोन टक्के व्याज देण्यांत येतें.
मुदतीच्या ठेवीवर : तीन ते साडे चार टक्के व्याज मुदतीप्रमाणें देण्यांत येतें.

ठेवीदाराचे व्यवहार सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत केले जातात. बँकेशीं व्यवहार करणारांचे सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत योजना करण्यांत येते.

सर्व प्रकारच्या मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार केला जातो. ठेवींवरील व्याजाचे दर अगर व्यवहाराच्या अटी समक्ष अगर पत्रद्वारें कळविण्यांत येतील.

को-ऑपरेटिव्ह संस्थांना मुदतीच्या ठेवींवर इतरांपेक्षा अर्धा टक्का व्याज जास्त देण्यांत येतें.

बी. डी. देशमुख,
चेअरमन.



## बँका आणि त्यांचे व्यवहार

दुसरी ताजी आवृत्ति प्रसिद्ध झाली.

किं. १ रु. ८ आणे

१ रु. १० आ. ६ पै चीं तिकिटें पाठवून मागणी करा.

: लेखक :

प्रो. वा. गो. काळे ◆ श्री. श्री. वा. काळे

बँकिंगविषयक प्रश्नांचें विवेचन करणारें
अत्यंत उपयुक्त पुस्तक

" अर्थ " ग्रन्थमाला, : : पुणें ४.

# महाराष्ट्राची पहिली गूळ कंपनी

श्री. डब्ल्यू. डी. चितळे यांच्या तज्ज्ञ व्यवस्थेखाली चालणार

# ॲग्रिकल्चरल् प्रॉडक्टस् लिमिटेड.

**यांत्रिक सहाय्यानें व फार मोठ्या प्रमाणावर गूळ तयार करून गुळाच्या क्षेत्रांत क्रांति करणारी पहिली गूळ कंपनी.**

व्यापारी जगांत नांवाजलेली मंडळी डायरेक्टर बोर्डांत आहेत.

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स:**

१ डॉ. आर. एच. भडकमकर
एम्. ए., एम. डी. पुणें नं. ४ चेअरमन.

२ शेठ चतुरभूज व्ही. जसाणी
भागीदार, मूळजी शिक्का आणि कंपनी; डायरेक्टर, दी नागपूर बँक लि. इत्यादि. गोंदिया ( सी. पी. )

३ शेठ हिराचंद माणिकचंद शहा
व्यापारी, डायरेक्टर, रावळगांव शुगर फॉर्म लि., पुणें नं. ४

४ श्री. नरहर वासुदेव करमरकर
व्यापारी, माटुंगा जी. आय्. पी., मुंबई नं. १९

५ श्री. भास्करराव व्ही. मराठे
मॅनेजिंग डिरेक्टर, गुडविल अॅशुअरन्स कं. लि., मिरज

६ सरदार ए. ए. मोपेराव
इनामदार, कोल्हापूर

७ शेठ गौतमचंद वेणीचंद शहा
गुळाचे व्यापारी, फलटण

८ श्री. डब्ल्यू. डी. चितळे
( एक्स ऑफिशियो ) उंसाचे बागाईतदार, ११८ सदाशिव पेठ, पुणें शहर.

**बँकर्स.**

१ दि बँक ऑफ इंडिया लि.
बुधवार पेठ, पुणें शहर.
२ दि बॉंबे प्रॉ. को. बँक लि. मुंबई.
३ दि पूना सें. को. बँक लि. पुणें.

**कायदा सल्लागार.**

मेसर्स के. जे. काळे अँड को.
सॉलिसिटर्स, कोट मुंबई.

**ऑडिटर्स.**

मेसर्स जी. एम्. ओक अँड को.
ऑडिटर्स, पुणें शहर.

**मॅनेजिंग एजन्टस्.**

मेसर्स डब्ल्यू. डी. चितळे अँड को. ११८ सदाशिव पेठ, पुणें शहर.

**रजिस्टर्ड ऑफिस.**

११८ सदाशिव पेठ, ट्रेनिंग कॉलेजचे पिछाडीस, पुणें शहर.

## भांडवल सुरक्षित व व्याज भरपूर

*प्रेफरन्स शेअरला प्राप्तीवरील कराविरहित ( Free of Income Tax ) शेकडा ६ टक्के डिव्हिडंड मिळावयाचें असून ऑर्डिनरी शेअर होल्डरांना शेकडा ६ टक्के डिव्हिडंड देतां येण्याइतका नक्की नफा कंपनीस झाल्याखेरीज मॅनेजिंग एजन्ट कांहींही कमिशन घेणार नाहींत.*

**अधिकृत भांडवल रुपये ५,००,००० ( पांच लाख ).**
**६,००० प्रेफरन्स शेअर्स, प्रत्येकी रुपये ५० चा.**
**२०,००० ऑर्डिनरी शेअर्स, प्रत्येकी रुपये १० चा.**

**सर्व अधिकृत भांडवल विक्रीसाठी काढिलें आहे.**

**शेअर्सच्या रकमा खालीलप्रमाणें भरावयाच्या आहेत.**
**प्रेफरन्स शेअर्सः—रु. २५ अर्जासोबत, रु. २५ अर्जमंजुरीनंतर.**
**ऑर्डिनरी शेअर्सः—रु. ५ अर्जासोबत, रु. ५ अर्जमंजुरीनंतर.**

## मॅनेजिंग एजन्टांनीं कंपनी काढण्यासाठीं कांहींही प्रमोशनमनी घेतला नाहीं.

## कंपनीचीं वैशिष्ट्यें.

१ उत्कृष्ट तज्ज्ञ व्यवस्था.
२ उसाच्या लागवडीपासून अव्वल दर्जाचा गूळ करण्यासाठीं उत्तम व निवडक जमीन.
३ कालव्याच्या पाण्याचा भरपूर पुरवठा व ह्या बाबतींत मुंबई सरकारची हमी ( ग्यारंटी ).
४ हिंव पडणाऱ्या क्षेत्राच्या बाहेर कंपनीची एस्टेट असल्यामुळें कंपनीच्या पिकास यत्किंचितही धोका नाहीं.
५ अकलूज व बारामती वगैरे महत्वाच्या गुळाच्या पेठा कंपनीच्या नजीक.
६ मालाची नेआण करण्याची उत्तम सोय.
७ गुळास अबाधित व अखंड मागणी.
८ गुळाची उत्पादन किंमत अत्यंत कमी.
९ देशांतल्या देशांत होणारी यांत्रिक सामुग्री.
१० व्यापारी जगांत नांवाजलेली वजनदार मंडळी डायरेक्टर बोर्डांत आहेत.
११ ऊंस व गूळ ह्या धंद्यांतील नांवाजलेल्या तज्ज्ञांचे व प्रख्यात हिंदी अर्थशास्त्रज्ञांचे कंपनीच्या कार्याविषयीं उत्कृष्ट अभिप्राय.

## प्रताप हायस्कूल, अंमळनेर

### प्रो. काळे ह्यांचीं व्याख्यानें

पूर्व खानदेश एज्युकेशन सोसायटी, अंमळनेर ह्या संस्थेच्या प्रताप हायस्कूलचा वार्षिक बक्षिस समारंभ गेल्या १० तारखेस प्रो. काळे ह्यांचे अध्यक्षतेखाली साजरा झाला. सदर हायस्कूल ही एक नमुनेदार शाळा असून तीमधील शिक्षणपद्धति आधुनिक स्वरूपाची आणि कार्यक्षम आहे. मुख्याध्यापक श्री. वाढ आणि त्यांचे सहकारी उत्साही व कार्यदक्ष असून त्यांस अंमळनेर मधील प्रमुख मंडळींचा पूर्ण पाठिंबा आहे. प्रो. काळे ह्यांनीं आपल्या भाषणांत अध्यापक व विद्यार्थी ह्यांचें त्यांच्या कामाबद्दल अभिनंदन केलें. विद्येच्या खऱ्या उपयोगाचें विवेचन करून त्या बाबतींत रूढ असलेल्या मतभेदाचा उल्लेख त्यांनीं केला आणि सध्याच्या शिक्षण-पद्धतींत आवश्यक झालेल्या सुधारणांचें दिग्दर्शन केलें. शारीरिक, बौद्धिक, आर्थिक व पारमार्थिक उन्नतीला सहायभूत होणारें शिक्षण हीच खरी विद्या कशी आहे हें प्रो. काळे ह्यांनीं दर्शविलें. प्रताप हायस्कूलची खेळण्याची विस्तीर्ण मैदानें, मुलामुलींची प्रकृति आणि शाळेंतील शिस्त यांचा निर्देश करून त्यांनीं शाळेची उत्तरोत्तर प्रगति होवो अशी इच्छा प्रदर्शित केली. तारीख ११ रोजीं प्रो. काळे ह्यांनीं ई. खा. ए. सोसायटीच्या, अंमळनेरांत पहिल्या तीन इंग्रजी इयत्ता शिकवणाऱ्या शाळेस भेट दिली आणि तेथील शिक्षण-व्यवस्था पाहून समाधान व्यक्त केलें.

### युद्धपरिस्थिति आणि हिंदुस्थान

पीस मेमोरिअल हॉलमध्यें प्रो. काळे ह्यांचें वरील विषयावर श्री. भालेराव वकील ह्यांच्या अध्यक्षतेखाली तारीख ११ रोजीं सकाळीं व्याख्यान झालें. मागच्या महायुद्धाचे अखेर प्रस्थापित झालेल्या शांततेच्या स्मरणार्थ बांधलेल्या वरील हॉलच्या स्वरूपाची चिकित्सा करून त्या युद्धानें अशांतता, अरेरावी, हिंसा व बळजोरीची वृत्ति ह्यांचें निर्मूलन अपेक्षेप्रमाणें न होऊन महायुद्धाची आपत्ति जगावर पुन्हां ओढवली असल्याचें त्यांनीं प्रारंभीं सांगितलें. चालू महायुद्धासारख्या रणधुमाळीचा विस्तार सर्व जगास कसा भोवतो ह्याचें वर्णन करून त्याच्या आर्थिक परिणामांचें विवेचन त्यांनीं केलें. आंतरराष्ट्रीय व्यापारांत व्यत्यय, शस्त्रास्त्रांवर फुकट पण विलक्षण खर्च, राष्ट्रीय कर्जाचा डोईजड बोजा, प्राणांचा व संपत्तीचा नाश, चलन-व्यवस्थेंत गोंधळ ह्या आपत्ति सर्व राष्ट्रांस भोगाव्या लागून त्यांतील सरकारांस नियंत्रणात्मक व्यवस्था करावी लागते, तिचें सविस्तर वर्णन व्याख्यात्यांनीं सुलभ रीतीनें केलें. हिंदुस्थानातल्या युद्धकालीन परिस्थितीची माहिती देऊन तिच्या-संबंधांत सरकार व जनता ह्यांचें काय कर्तव्य आहे, ह्याचेंहि दिग्दर्शन त्यांनीं केलें. आंतरराष्ट्रीय व्यापार व राष्ट्रीय उद्योगधंदे ह्यांमध्यें युद्धाची तयारी व प्रत्यक्ष होणाऱ्या लढाया ह्यामुळें झालेल्या महत्वाच्या फेर-बदलाचें स्वरूप रोजच्या व्यवहारांतली उदाहरणें देऊन व्याख्यात्यांनीं विशद करून सांगितलें. व्याख्यानास लहानमोठी मंडळी, शिक्षक, विद्यार्थी व विद्यार्थिनी ह्यांची गर्दी झाली होती आणि प्रो. काळे ह्यांनीं केलेल्या सुबोध विवेचनाचें अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत कौतुक केलें.

स्पृहणीय यश
बोनसचे दरांत २० टक्के वाढ
तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक–दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच " कॉमनवेल्थ " ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स
कंपनी लि० पुणें
लिखा अगर समक्ष भेटा.
श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल्. बी.
मॅनेजिंग एजंट.
सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे
★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस
★ जांभळाच्या बियाची पूड ★ इतर रस व पेयें
सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.
रजिस्टर्ड ऑफिस : ७५४ शुक्रवार, पुणें २
बिझिनेस ऑफिस : ११२A सदाशिव, पुणें २
न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एस्सी.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
Examiner Press Building, Dalal Street, Bombay
716 Sadashiv Peth, Poona City

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

## औंध स्टेट बँकिंग अँड इन्शु. कं. लि.

### नवीन इमारतीचें उद्‌घाटन

औंध स्टेट बँकिंग ॲन्ड इन्शुअरन्स कंपनी हिच्या नवीन भव्य व सुंदर इमारतीचा उद्‌घाटन समारंभ श्रीमंत राजेसाहेब भवानराव प्रतिनिधि यांचे हस्तें ता. १० मार्च रोजीं मोठ्या थाटानें साजरा झाला. समारंभास संस्थानचे मुख्य मंत्रि श्री. अप्पासाहेब पंत, श्रीमंत सौ. मा. राणीसाहेब, राजकुमारी श्रीमंत आक्कासाहेब, श्री. शंकरराव किर्लोस्कर, श्री. गुरुनाथराव ओगले, संस्थानचे माजी दिवाण श्री. दर्शने, मंत्रि श्री. ए. ए. कुरेशी, बॉंबे प्रॉव्हिन्शियल को-आपरेटिव्ह बँक लि. चे श्री. एम्. आर. काळे इत्यादि मंडळी हजर होती.

### श्री. सातवळेकर ह्यांचें भाषण

सुरवातीला स्वागतपर पद्य झाल्यावर बँकेचे एक डायरेक्टर व 'पुरुषार्थ' मासिकाचे संपादक पंडित श्री. सातवळेकर यांचें प्रास्तविक भाषण झालें. त्यांत त्यांनीं वेदकालापासून संयुक्त जबाबदारीचे तत्त्वावर व्यापार करण्याची कल्पना कशी रूढ झाली होती हें वेदांतील कांहीं शब्द दाखवून सिद्ध केलें. औंधसारख्या छोट्या संस्थानानें जें प्रगतीपर धोरण दाखविलें तिकडे लक्ष दिलें म्हणजे संस्थानचें भविष्य उज्वल दिसतें. संस्थानांतील कर्तृत्ववान् व्यक्ति महत्वाकांक्षेनें प्रेरित झाल्या म्हणजे अशक्य असें कांहीं नाहीं. प्रस्तुत बँकिंग ॲन्ड इन्शुअरन्स कंपनीच्या शाखाहि भारतवर्षांत प्रमुख ठिकाणीं पसरोत अशी आशा व्यक्त करून त्यांनीं आपलें भाषण संपविलें.

### संदेशवाचन व अहवाल

संदेशवाचन झाल्यानंतर कंपनीचे जनरल मॅनेजर श्री. बी. आर. वर्तक यांनीं आपल्या भाषणांत कंपनीच्या कार्याचा अहवाल सांगितला. बँकेची आणि विमा कंपनीची आतांपर्यंतची प्रगति अभिमानास्पद आहे असें ते म्हणाले आणि औंध संस्थानच्या आर्थिक संसारांत या कंपनीला मानाचें स्थान असल्याचें त्यांनीं सांगितलें.

### श्री. किर्लोस्कर ह्यांचें भाषण

श्री. वर्तक यांचे भाषणानंतर कंपनीचे चेअरमन श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनीं राजेसाहेबांना इमारतीचें उद्‌घाटन करण्याची विनंति करतांना कंपनीच्या प्रगतीच्या श्रेयाचा बराचसा वाटा कंपनीचा व्यवस्थापक व नोकरवर्ग यांचेकडे जात असल्याचें सांगितलें. त्याबरोबरच मिळालेल्या यशानें हुरळून न जातां त्यांनीं दुप्पट जोरानं कार्यप्रवण झालें पाहिजे असें ते म्हणाले.

### औंधच्या राजेसाहेबांचें भाषण

श्रीमंत राजेसाहेबांनीं टाळ्यांच्या गजरांत व बँडच्या सुस्वर वाद्नांत इमारतीचें उद्‌घाटन केलें व प्रमुख मंडळींसह बँकेच्या इमारतीची तळघरासह पाहणी केली. नंतर ते आपल्या भाषणांत म्हणाले, "एकेकाळीं खिलारांचे व्यापारांत औंध अग्रेसर होतें. त्याची आतां पिछेहाट झाली आहे. बँकेनें या व्यापारास उत्तेजन दिलें पाहिजे. प्रगतीचा विचार करतांना झालेल्या चुका उगाळण्यांत अर्थ नाहीं. त्यापासून योग्य तो धडा घ्यावा म्हणजे झालें. 'वाहिली ती गंगा व राहिलें तें तीर्थ' अशी दृष्टी ठेवली पाहिजे. खेडेगांवांतून शेतकरी सावकारांच्या भारी व्याजाचे दरानें जेरीस येतो. बँकांनीं कमी व्याजाच्या दरांनीं शेतकऱ्यांना कर्जें दिलीं पाहिजेत. संस्थानच्या हद्दींतील प्रत्येक गांव स्वयंपूर्ण झालें पाहिजे. आमच्या कापसाचें कापड आमच्या कोष्ट्यांनीं विणलें पाहिजे. कच्चा माल शक्य तर तयार होऊन बाहेर गेला पाहिजे, म्हणजे संस्थानी प्रजेची संपन्नता वाढून कल्याण होईल. कच्ची लोकर बाहेर जाण्यापेक्षा तिचें कापड होऊन रवाना होईल तर उत्कर्ष होईल. करंजेल तेलावर आमचे प्रभाकर कंदील जळूं लागतील तर मला आनंद वाटेल. आमच्या पुढें असलेल्या योजना व्यवहारांत आणण्याची बँकेनें खटपट करावी."

### समारोप

यानंतर श्रीमंतांनीं इमारतीचे कंत्राटदार मेसर्स म्हैसूर होम्स लि. चे व्यवस्थापक श्री. संजीवनराव यांना सुवर्ण पदक दिलें. कंत्राटदारांनींहि श्री. किर्लोस्कर यांना स्मरण ढाल अर्पण केली. या ढालीवर इमारतीची आकृति कोरलेली आहे. याच प्रसंगीं बँकेच्या नोकरवर्गानें नजर केलेल्या श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांच्या चित्राचेंहि अनावरण श्रीमंतांच्या हस्तें झालें. वंदे मातरम्, पानसुपारी व अत्तरगुलाब होऊन हा समारंभ संपला. यानंतर बँकेनें राजेसाहेबांना व पाहुण्यांना थाटाची मेजवानी दिली.

---

## महाराष्ट्राचे तरूण, होतकरू व कर्तबगार कारखानदार

### गुळाच्या पहिल्या कारखान्याचे उत्पादक

### श्री. वामनराव चितळे.



ऊंस व गूळ ह्यां धंद्यांतील तज्ज्ञ म्हणून श्री. चितळे ह्यांचा फार लौकिक आहे. यांत्रिक सहाय्यानें फार मोठ्या प्रमाणावर गूळ तयार करण्याची कंपनी ह्यांनीं नुकतीच काढली असून तीमुळें महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांत मोठी भर पडणार आहे. ह्या धंद्यांतील सर्व तज्ज्ञांनीं व त्याचप्रमाणें प्रसिद्ध हिंदी अर्थशास्त्रज्ञांनींही श्री. चितळे ह्यांच्या प्रयत्नास पूर्ण पाठिंबा दिला असून ही कंपनी अत्यंत वाईट परिस्थितींतही शेअर होल्डरांना शेकडा ६ ते ९ टक्के डिव्हिडंड सहज देऊं शकेल असें नमूद केलें आहे. श्री. चितळे ह्यांच्या प्रयत्नास यश मिळून औद्योगिक प्रगति—पथावरच्या महाराष्ट्राचें पाऊल पुढें पडो असें आम्ही इच्छितों.

## इंपीरिअल इन्स्टिट्यूट ऑफ शुगर टेक्नॉलॉजी, कानपूर

हिंदुस्थानांतील साखरेच्या धंद्याची चांगली वाढ होण्यास एका मध्यवर्ती संशोधन संस्थेची आवश्यकता आहे, असें मत १९२० च्या इंडियन शुगर कमिटीनें व्यक्त केलें होतें. १९३० च्या टॅरिफ बोर्डाच्या रिपोर्टनें ह्याच शिफारसीचा पुनरुच्चार केला. गेल्या कांहीं वर्षांत हिंदी साखरेच्या धंद्याचा विशेष विस्तार झाल्या-कारणानें, त्याबाबतच्या संशोधनाची आवश्यकता अधिकच तीव्रतेनें जाणवूं लागली. अखेर, हिंदुस्थान सरकारनें १ ऑक्टोबर, १९३६ रोजीं कानपूर येथें वरील इन्स्टिट्यूट पांच वर्षांच्या मुदतीनें स्थापन केली. हरकोर्ट बटलर टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूटमध्यें हिंदुस्थान सरकारच्या देखरेखीखालीं एक साखर विभाग होता, त्याचेंच संयुक्त प्रांत सरकारच्या संमतीनें इंपीरियल इन्स्टिट्यूट ऑफ शुगर टेक्नॉलॉजींत रूपांतर करण्यांत आलें. कानपूर ही हिंदी साखरेची बाजारपेठ असून तें शहर साखरेच्या लागवडीच्या प्रमुख क्षेत्रांचे समीप आहे. साखरेच्या उत्पादनासंबंधीं सर्वसाधारण संशोधन, ह्या धंद्यांतील वाया जाणाऱ्या गोष्टींच्या उपयोगाविषयीं खटपट, उसाच्या नवीन जातींचा व कारखान्यांतील परिस्थितींतील पहाणी इत्यादि साखरेविषयीं प्रश्नांचा विचार कानपूर येथील इन्स्टिट्यूटमध्यें करण्यांत येतो. इन्स्टिट्यूटचा कारभार हिंदुस्थान सरकार पहातें. श्री. आर. सी. श्रीवास्तव हे इन्स्टिट्यूटचे पहिले डायरेक्टर आहेत. इन्स्टिट्यूटच्या कार्याबद्दल सल्ला वगैरे देण्यासाठी प्रातिनिधिक मंडळाची योजना आहे.

इन्स्टिट्यूट साखरेच्या कारखान्यांस सर्व तऱ्हेचा शास्त्रीय सल्ला देण्यास तयार असते आणि त्यासाठी योग्य ती फी आकारण्यांत येते. नवीन कारखाने काढणारास सर्व तऱ्हेची माहिती इन्स्टिट्यूटकडे मिळूं शकते. कोणत्या प्रकारची यंत्रसामुग्री मागवावी, कोणतें टेंडर मंजूर करावें, कारखान्यास क्षेत्र कोणतें निवडावें, चालू कारखान्यांची वाढ कशी करावी, यंत्रांची कार्यक्षमता कशी वाढवावी, उत्पादनाची पद्धत कशी सुधारावी, खर्चाची बचत कोठें करावी इत्यादिबाबत सल्ला इन्स्टिट्यूटकडे मिळूं शकतो.

साखरेच्या कारखान्यांतील विशिष्ट जागांसाठी लागणारें शिक्षण इन्स्टिट्यूटमध्यें दिलें जातें आणि त्यासाठी पाच शिक्षणक्रम आहेत. जे अगोदरच कामावर आहेत. त्यांचेकरितां आठ लहान शिक्षणक्रम आहेत. संयुक्त प्रांत, बिहार आणि बंगाल सरकारांनीं आपल्या विद्यार्थ्यांकरितां कांहीं शिष्यवृत्त्या ठेविल्या आहेत. साखरेच्या कारखान्यांकडून सर्व तऱ्हेची माहिती जमा करून ती योग्य तऱ्हेनें जुळवण्याचें कामहि इन्स्टिट्यूट करतें.

इंडियन शुगर ट्रेड इन्फर्मेशन सर्व्हिसची १९२४ सालीं स्थापना झाली. ह्या सर्व्हिसमार्फत हिंदुस्थानांतील साखरेच्या २७ प्रमुख बाजार पेठासंबंधी माहिती पुरविली जाते. वरील सर्व्हिस जी माहिती पुरविते त्या बरोबरच अधिक माहिती ( उ. एअरमेलनें परदेशांतील साखरेच्या धंद्याविषयीं आलेली माहिती ) शुगर पोस्टल सर्व्हिस पुरविते. ह्या दोन्ही सर्व्हिसेसची वार्षिक वर्गणी अनुक्रमें १९० आणि १८० रुपये आहे.


## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना—७ सप्टेंबर १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| उभारलेलें भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,११,००,००० |

मुख्य कचेरी—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

शाखा—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), बांद्रे ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), कुलाबा ( मुंबई ), काळबादेवी, ( मुंबई ), अहमदाबाद, अहमदाबाद–स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, चौरंघी स्क्वेअर ब्रँच, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी, नागपूर ( किंग्जवे ), जमशेदपूर

लंडन एजन्ट्स—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल, परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यावर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय, ट्रस्टी, या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंटः—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड.

लक्ष्मीरोड, पुणें शहर.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल........रु. | १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल ...रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल........रु. | ३,०६,१५० |
| वसूल झालेलें भांडवल...रु. | १,५२,९७५ |

शाखा

अॅडव्हर्टायझर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

डायरेक्टर्स

प्रो. व्ही. जी. काळे, चेअरमन, श्री. डी. के. साठे, व्हा. चेअरमन, श्री. एन. जी. पवार, श्री. डी. व्ही. रानडे, श्री. व्ही. पी. वर्दे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एच. डी. पवनजी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक काढतां येतात.

बँकेचे नियम व व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम. व्ही. भोसले, मॅनेजर.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ३% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... ... | ११२—० |
| ५% ( १९४०-४३ ) लोन ... ... ... | १०१-११ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०६—२ |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९४—० |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०४—६ |
| ३% ( १९६३-६५ ) ... ... ... | ९३—२ |
| २¾% १९४८-५२ ... ... ... | ९७-१९ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०६—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०५—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३) ... .. | ११०-१२ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२१—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००-५० ) ११% ... ... | १४०—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ९९—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ४% ... | ३६—३ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५२०—० |
| बॉंबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ४% ... ... | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०९—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १३१—४ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १९१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १८२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३६०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४९०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४¾% ... ... | ९५—८ |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) २% ... ... | ७२—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९५५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७५७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | २१४—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. ... ... | ४५—० |
| शिंद्या स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १८—२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. ... | ३८-१० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४३५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०३-१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १४४—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३७५—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | १९८५—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु ... | ११९—४ |





एजंट:—

महादेव गोविंद कुलकर्णी

किराणा व भुसार मालाचे व्यापारी

७८६ सदाशिव पुणें शहर.

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन

जर्निमन टेलर व्हा.

मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष

पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७१ सदाशिव, पुणें.

हप्त्याचे अत्यंत कमी दर असलेल्या

दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल अशुअरन्स कं. लि.

ह्या महाराष्ट्रीय विमा संस्थेचा पहिल्या पंचवार्षिक मूल्यमापनाचा निर्णय

हयातींतील विम्यावर दर हजारीं ५०

हेड ऑफिस : जळगांव ( पू.खा. )

मुंबई शाखा : को-ऑपरेटिव्ह बिल्डिंग, फेरोजशा मेथा रोड.

हयातीनंतरच्या विम्यावर दर हजारीं ६०

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its,

## YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

## PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you:

**NEW BUSINESS**

**Last year 1937-38**

**Exceeds**

**Rs. 3 CRORES**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Office* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth



## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Ravlwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.



## अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.



फर्म, कंपनी, सोसायटी

## कायदा

लेखक : श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, बी. ए. ( ऑनर्स ), एलएल्. बी.

"न्यायबोध" या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेली लेखमाला आतां पुस्तकरूपानें तयार झाली. फर्म, कंपनी, सोसायटी यांच्या कायद्यासंबंधीं विवेचन या पुस्तकांत केलेलें आहे. हें विवेचन मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें पुस्तक संग्रहीं ठेवणें अवश्य आहे. ट.ख. सह किंमत ८६ आण्यांचीं तिकिटें पाठवा.

मॅनेजर : सेंट्रल लॉ हाउस,

तुळशीबागरोड : : नागपूर शहर



## विमा—जगत्

विमाविषयक प्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारें मराठींतील एकमेव मासिक.

जानेवारी १९४० पासून ३ ऱ्या वर्षास सुरुवात. केव्हांहि वर्गणीदार होतां येतें.

**वार्षिक वर्गणी फक्त २ रुपये**

दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होतें.

व्यवस्थापक—विमा—जगत्, पुणें २.






## स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारास टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डि. नं. १ )

१५३।१ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी ' दुर्गाधिवास, ' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.